पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड
पीएमपीएमएल बिल्डींग, शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११०३७ फोन नं : ४४४०४१७

# जाहीर प्रकटन

परिवहन महामंडळाच्या सेवकांना कॅन्टीन सुविधेसाठी एकूण १३ आगारांमध्ये प्रत्येकी १५० चौ. फुट मोकळी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. सदर आगारांमध्ये खाजगी संस्था, व्यवसायिक व्यक्ती व महीला बचत गट इत्यादिंकडून निविदा प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन (बंद लिफाफा) पध्दतीने मागविणेत येत आहेत.

या बाबतच्या अटी—शर्तीची माहिती महामंडळाच्या www.pmpml.org या संकेतस्थळावर तसेच स्वारगेट मुख्य कार्यालयाचे मालमत्ता विभागात पहावयास मिळेल. सदरच्या निविदा ऑनलाईन पध्दतीने www.mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर भरता येतील व ऑफलाईन (बंद लिफाफा) पध्दतीने महामंडळाचे स्वारगेट येथील मुख्य कार्यालयाचे मालमत्ता विभागात निविदा अर्ज मिळतील. सदरचे अर्ज दि.१३/१०/२०२१ ते दि.०९/११/२०२१ पर्यंत भरता येतील. निविदा दि. १०/११/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वा. उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे संबंधीचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

Sd/-
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

जाहिरात क्रं. २ मालमत्ता
पुणे दिनांक : १३/१०/२०२१

# पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड

PUNE MAHANAGAR PARIVAHAN MAHAMANDAL LIMITED

पीएमटी बिल्डींग, स्वारगेट पुणे ४११०३७

PMT BUILDING, SWARGATE PUNE 411037

**CIN NO** – U60210PN200PLC130461 **WEBSITE** – www.pmpml.org **EMAIL :** (Departmental)

फोन नं : २४४४०४१७

**Phone No** : 24440417

**फॅक्स** : २४४४५४९०

**FAX** : 24445490


**जावक क्रं** : पीएमपीएमएल/मालमत्ता/ दिनांक : १३/१०/२०२१

**Ref. No.** : PMPML/ Estet/

## जाहिर प्रकटन

परिवहन महामंडळाच्या सेवकांना कॅन्टीन सुविधा उपलब्ध करून देणेबाबत खालील तक्त्यात नमुद आगारांमध्ये मोकळी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे सदर आगारांमध्ये खाजगी संस्था, व्यवसायिक व्यक्ती व महीला बचत गट इ. कॅन्टीनसाठी ३+३ अशी ६ वर्षे मुदतीकरीता व प्रत्येकी तीन वर्षांनी १२ टक्के भाडेवाढ या प्रमाणे जागा लिव्ह अॅण्ड लायसेन्स पध्दतीने भाडेकराराने द्यावयाच्या असुन त्यासाठी निविदा प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन (बंद लिफाफा) पध्दतीने मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | आगाराचे नाव | कॅन्टीनसाठी उपलब्ध असलेली जागा (चौ.फुट) | टेंडरफॉर्म फी जीएसटी सह रक्कम रूपये | बयाना रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | स्वारगेट आगार, शंकर शेठ रोड, पुणे ४१ | १५० | १६५२ | ७००० |
| २ | नतावाडी आगार, शिवाजी नगर, पुणे ०५ | १५० | १६५२ | ७००० |
| ३ | कोथरूड आगार, पौड रोड, पुणे ३८ | १५० | १६५२ | ७००० |
| ४ | बालेवाडी आगार, (मुंबई बेंगलोर हायवे) पुणे ४५ | १५० | १६५२ | ७००० |
| ५ | कात्रज आगार, राजीव गांधी प्राणी संग्राहालयासमोर, पुणे ४६ | १५० | १६५२ | ७००० |
| ६ | अप्पर इंदिरानगर आगार, पुणे ३७ | १५० | १६५२ | ७००० |
| ७ | हडपसर आगार, गाडीतळ, पुणे २८ | १५० | १६५२ | ७००० |
| ८ | भेकराईनगर आगार, पुणे सासवड रोड, पुणे २८ | १५० | १६५२ | ७००० |
| ९ | शेवाळवाडी आगार, पुणे सोलापुर रोड ,पुणे २८ | १५० | १६५२ | ७००० |
| १० | मार्केट यार्ड आगार गुलटेकडी पुणे ३७ | १५० | १६५२ | ७००० |
| ११ | निगडी आगार, भक्ती शक्ती चौक पुणे ४४ | १५० | १६५२ | ७००० |
| १२ | भोसरी आगार, पुणे २६ | १५० | १६५२ | ७००० |
| १३ | नेहरूनगर आगार, पिंपरी पुणे १८ | १५० | १६५२ | ७००० |

बंद लिफाफा पध्दतीने इच्छुक संस्था, व्यवसायिक व्यक्ती व महीला बचत गट यांनी महामंडळाचे मालमता विभागामधुन नियमानुसार निविदा फॉर्म फी भरून निविदा फॉर्म घेण्यात यावा. तसेच दरमहा प्रति चौ. फुटास जास्तीत जास्त किती लायसेन्स फी व अनामत रक्कम देण्यास तयार आहेत याबाबतची माहीती निविदा फॉर्ममध्ये स्पष्ट नमुद करावी. उपरोक्त जागांसाठींचे निविदे सोबत बयाना रक्कम डी.डी. व्दारे भरणे आवश्यक आहे अन्यथा निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. डी.डी. ßपी.एम.पी.एम.एल.फंड अकाÅटÞ या नावाने काढण्यात यावा. निविदा अमान्य झाल्यास बयाना रक्कम परत करण्यात येईल. बयाना रक्कम व अटी–शर्ती या बाबतची माहिती परिवहन महामंडळाचे स्वारगेट येथील मुख्य कार्यालयाचे मालमत्ता विभागात व महामंडळाच्या www.pmpml.org या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

तसेच इच्छुकांना सदरच्या निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीनेही दि. १३/१०/२०२१ ते दि. ०९/११/२०२१ पर्यत भरता येतील सदर निविदा भरताना निविदा फॉर्म फी व बयाना रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल तसेच ऑफलाईन पध्दतीने निविदा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. स्वारगेट पुणे ३७ या पत्यावर बारनिशी विभागाकडे कार्यालयीन सुट्टी वगळता सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत दि. १३/१०/२०२१ पासुन दि.०९/११/२०२१ पर्यंत जमा करावयाच्या आहेत. प्राप्त निविदा दि. १०/११/२०२१ रोजी दुपारी. ३.०० वाजता उघडल्या जातील.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे संबंधीचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

**Sd/-**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि**

जाहिरात क्रं. २ मालमत्ता

दिनांक : १३/१०/२०२१.

—: निविदा अटी व शर्ती :—

कामाचे स्वरूप: परिवहन महामंडळाचे १३ डेपोत मोकळया जागेमध्ये कॅन्टीन उभारून सेवकांसाठी स्वच्छ व ताजे खा| पदार्थांचा माफक दरात पुरवठा करणे.

एकुण क्षेत्रफळ :— मोकळी १५० चौ. फुट जागा.

आवश्यक कागदपत्रे: १) संस्था चालविण्याचे प्रमाणपत्र

२) निविदाधारकाचे कुटुंबिय परिवहन महामंडळाच्या सेवेत असल्यास निविदा सादर करताना या संदर्भातील माहितीचे प्रतिज्ञापत्र.

३) टेंडर बयाणा रक्कम ईसीएस/आरटीजीएस/एनईएफटी व्दारे भरणे बंधनकारक आहे. अन्यथा टेंडर ग्राहय धरले जाणार नाही.

४) चारित्र्याचा दाखला आवश्यक.

५) अनुभवाचा दाखला आवश्यक.

६) अन्न व औषध प्रशासन यांचे प्रमाणपत्र आवश्यक.

७) निविदे सोबत बयाणा रक्कम :— रूपये प्रत्येकी ७०००/— चा डी.डी. आवश्यक आहे.

1½ परिवहन महामंडळाचे सेवकासाठी सदर कॅन्टीनमध्ये स्वच्छ व ताजे खा|पदार्थ कमीतकमी दरामध्ये पुरवठा करणे आवश्यक आहे. उदा.

| Sr.No | Name Of The item | | Rate R/s | Sr.No | Name Of The item | Rate R/s |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Rice Plate | Quantity | | 11 | Samosa 100gm | 10/- |
| | Chapati | 3 | 45/- | 12 | Tea 100mg | 5/- |
| | puri | 5 | | 13 | special Tea 100ml | 10/- |
| | veg dish dry | 50gm | | 14 | coffee 100ml | 10/- |
| | gravy dish | 50gm | | 15 | Milk 100ml | 10/- |
| | rice | 200gm | | 16 | Buttermilk 100ML | 10/- |
| | papad | 1 | | 17 | Batato vada Sambar | 20/- |
| 2 | chapati bhaji | | 20/- | 18 | Bhaji | 15/- |
| | chapati | 2 | | 19 | Idli- Sambar | 20/- |
| | bhaji | 1 | | | Idli 02 | |
| 3 | Plain Rice | 200gm | 10/- | | sambar 120gm | |
| 4 | Dal Rice | 100gm | 20/- | 20 | Batato Vada 100gm (2 vada) | 20 |
| 5 | Shira sweet | 100gm | 15/- | 21 | Vada Pav | 10/- |
| 6 | Pohe | 100gm | 15/- | | | |
| 7 | Upma | 1 | 15/- | | | |
| 8 | Misal | 150gm | 30 | | | |
| | slice | 2 | | | | |
| 9 | Sabudana khichadi | 100gm | 15/- | | | |
| 10 | Bhaji | 100gm | 10/- | | | |

२) बंद पाकिटातील पदार्थ/पेय नमुद किंमतीपेक्षा जास्त किंमतीत विकता येणार नाहीत. सदरचे दर हे वार्षिक असुन सदर दरामध्ये वाढ करावयाची झाल्यास परिवहन महामंडळाची संमती घेणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक डेपो येथे कॅन्टीनसाठी महामंडळाकडून १५० चौ.फुट मोकवी जागा उपलब्ध करूण देण्यात येईल. सदर जागेवर मान्य निविदाधारकाने स्वखर्चाने कॅन्टीन उभारून त्यासंबंधी आवश्यक असणारे परवाने घेणे बंधनकारक आहे.

४) मान्य निविदाधारकांनी नमुद केलेले दरमहा भाडे अदा करावयाचे असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे वजावट करता येणार नाही, त्यामध्ये कोणत्याही शासकीय/निम्मशासकीय करांचा समावेश नाही,तसेच लायसेन्स फी कराराच्या मुदतीमध्ये होणारे महापालिकेचे कर अथवा केंद्र/राज्य शासनाचे अस्तित्वात असलेले कर अगर पुढे अस्तित्वात येणारे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कर, वीज बीले, मालमत्ता कर,इ. मान्य निविदाधारकाने भरावयाची आहेत.

५) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वरील मिळकतींचा ३+३ असा ६ वर्षे कालावधीच्या मुदतीकरिता भाडेकराराने विनियोगाकरिता जास्तीत जास्त मासिक भाडे रक्कम देवु करणाऱ्या व्यक्ती/संस्थांकडुन जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच देवु करणाऱ्या मासिक भाडे रक्कमेवर दर तीन वर्षानी १२ टक्के भाडेवाढ केली जाईल.

६) निविदामान्यतेनुसार निविदाराने मिळकतीचा ताबा घेतलेनंतर, पुणे शहरामध्ये मिळकती असलेले कोणत्याही दोन व्यक्ती हमीदार/जामिनदार म्हणुन त्यांचे शपथपत्र करारनामा करण्यापुर्वी आमच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारकराहील.

७) निविदाराने दरमहाचे जीएसटी टॅक्ससह भाडे रक्कम प्रतिमहा १० तारखेच्या आंत परिवहन महामंडळाकडे जमा करावयाचे आहे. तसे न केल्यास अथवा भाडे थकविल्यास, भाडे रक्कम निविदादाराकडुन तसेच त्यांचे दोन हमीदार/जामिनदार यांचेकडुन वसुल करण्याचा अधिकार परिवहन महामंडळास राहिल.

८) निविदाधारकाचे कुटुंबिय परिवहन महामंडळाचे सेवेत असल्यास, निविदा सादर करताना या संदर्भातील सर्व माहिती निविदाधारकाने प्रतिज्ञापत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय नांव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशील स्पष्ट नमुद करण्यात यावा.

९) सदर जागेचा वापर हा निविदादार यांना फक्त कॅन्टीनचे व्यवसायासाठीच करता येईल.

१०)निविदा भरल्यानंतर पात्र निविदादाराने कोणत्याही कारणास्तव निविदा मागे घेतल्यास निविदा बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

११)पात्र निविदादारास उक्त मिळकत देणेबाबतचे प्रस्तावास मिळालेल्या प्रशासकीय मान्यतेबाबत निविदादारास कळविलेचे दिनांकापासुन संबंधित निविदादाराने १५ दिवसाचे आंत **६ महिन्यांच्या भाडे रक्कमेइतकी रक्कम अनामत म्हणुन जमा करून** तसेच त्यापुढील १५ दिवसांत नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक राहील. तसेच निविदादाराने मिळकतीचा ताबा घेताना ताब्याच्या उर्वरीत संपुर्ण कालावधीच्या भाडे रक्कमेचे आगावु धनादेश परिवहन महामंडळाकडील कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील. तसेच ३ महिने अथवा त्यापेक्षा जास्त काळ भाडे थकल्यास भाडेकरार रí d:u tkxspk rkck egkeaMGkekQZr ?ks.;kr ;sbZy o vuker jDdesrqu Fkfdr HkkMsjDde olqy dj.;kr ;sbZy-

१२)जागा वापराच्या करारनाम्याची मुदत ३+३ अशी ६ वर्षे कालावधीची राहील. पात्र निविदाधारकाने नोंदणीकृत करारनामा करावयाचा असुन त्यासाठी येणार खर्च, फी इ. तद~षंगिक बाबी निविदाधारकाने स्वतः करावयाच्या आहे. पात्र निविदाधारकाचा करारनामा कालावधी संपुष्टात आल्यानंतर मुदतवाढ दयावयाची असल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार परिवहन महामंडळाने राखुन ठेवलेले आहेत.

१३)सदरच्या कॅन्टीनच्या व्यवसायापासुन आजुबाजुच्या रहिवाशांना व नागरिकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव वा त्रास होणार नाही याबाबतची योग्यती दक्षता निविदादारानी घ्यावयाची आहे.

१४)सदर मिळकतीबाबत संपुर्ण मिळकत अथवा त्याचा कोणताही भाग पोट—भाडयाने देता येणार नाही.

१५)मिळकत वापराच्या कराराच्या मुदतीत परिवहन महामंडळाकडे सदर मिळकतीबाबत घेतलेले निर्णय बंधनकारक राहतील.

१६)निविदादार यांनी सदर करारानुसार काम करावयाचे नसल्यास अथवा करार रद~द करावयाचा असल्यास त्यांनी त्याबाबत परिवहन महामंडळास तीन महिने अगोदर पुर्व सुचना दयावयाची आहे.

१७)मिळकतीचा ताबा कोणतीही पुर्व सुचना न देता करारनामा मुदतीपुर्वीच सोडुन दिल्यास अथवा नियम बाहय कृतीमुळे रí झाल्यास जमा केलेली अनामत रक्कम व त्यावरील व्याज निविदादारास मागण्याचा अधिकार

राहणार नाही.

१८)मिळकतीची संपुर्ण संरक्षणाची व देखभालीची जबाबदारी संबधित निविदादारावर राहील. मिळकतीची देखभाल/दुरूस्ती संबधित निविदादाराने स्वत: करावयाची आहे.

१९)भाडेकरार कालावधीमध्ये पुणे परिवहन महामंडळास सदर मिळकतीची काही कारणास्तव गरज भासल्यास अथवा मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांनी तसे आदेश दिल्यास किंवा मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांना वाटल्यास निविदादार यांनी सदर मिळकतीमधील त्यांचे सर्व साहित्य चीजवस्तु वगैरे सर्व स्वखर्चाने त्वरीत हलवुन मिळकतीचा खुला ताबा महामंडळाकडे देण्याची व्यवस्था करावयाची आहे.

२०)सदरील मिळकतीसाठी पुरेसा वीज पुरवठा व प्रकाश व्यवस्था करणे व त्याची देयके भरणे तसेच पाणी पुरवठा व त्याची देयके भरणे याची जबाबदारी संबंधित निविदादारावर राहील. वीज बील थकल्यास त्याची जबाबदारी परिवहन महामंडळावर राहणार नाही.

२१)जागा वापराच्या कालावधीमध्ये सदरील मिळकतीची देखभाल व दुरूस्ती संबधित निविदादाराने करावयाची असुन कराराची मुदत संपल्यावर मिळकत सुस्थितीत परिवहन महामंडळाच्या ताब्यात देणे निविदादारावर बंधनकारक आहे. त्याबाबत निविदादारास कोणत्याही प्रकारची हरकत घेता येणार नाही. नुकसान भरपाईची रक्कम परिवहन महामंडळाने ठरवेल त्याप्रमाणे रक्कम भरणे बंधनकारक राहील.

२२)सदरील मिळकतीची वेळोवेळी तपासणी करण्याचे अधिकार परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना राहतील व अशा प्रसंगी त्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा करता येणार नाही.

२३)निविदा अमान्य झाल्याचे समजल्यानंतर निविदा अनामत रक्कमेची लेखी मागणी केल्यानंतर अनामत रक्कम परत देण्याची कार्यवाही तीन महीन्यात करण्यात येईल.

२४)निविदादारास जेवढया मिळकतीचा ताबा मोजमाप करून देण्यात येईल. तेवढयाच जागेचा वापर करता येईल. अतिरिक्त जागा वापरात येणार नाही. तसेच मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा किरकोळ दुरूस्तीचा अंतर्गत बदल परिवहन महामंडळाच्या पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

२५)निविदाधारकाने संपुर्ण जागेची, किचनची स्वच्छता ठेवावयाची आहे. तसेच तयार करण्यात येणारे खा|पदार्थाचा दर्जा चांगल्या प्रतिचा ठेवण्यात यावा व अन्न विषबाधा असे प्रकार घडणार नाहीत या बाबतची दक्षता घ्यावयाची आहे. असा प्रकार घडल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित निविदादारकाची राहील. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मनपा यांचे नियमानुसार परवाना व इतर सर्व बाबींची पुर्तता संबधित निविदाधारकाने करावयाची आहे. कॅन्टीनच्या जागेची व त्यामधील उपकरणाची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील. कॅन्टीन चालविण्यासाठी आवश्यक सर्व साहित्य मान्य निविदाधारकाने स्वखर्चाने आणावयाचे आहे.

२६)सदर कॅन्टीनसाठी परिवहन महामंडळामार्फत पाण्याची व्यवस्था करण्यात येईल तसेच महामंडळामार्फत पाणी पुरवठयास व्यत्यय आल्यास मान्य निविदाधारकाने स्वखर्चाने पाण्याची व्यवस्था करावयाची आहे.

२७)वरील अटी–शर्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अटी–शर्तीचा समावेश भाडेकरारामध्ये करण्याचा अधिकार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

२८)भाडेकराराच्या मुदतीमध्ये कोणत्याही कारणास्तव भाडेकरार संपुष्टात आल्यास कॅन्टीनसाठी बांधकाम केलेली जागा निविदाधारकाने बांधकाम स्वत: स्वखर्चाने निरस्त करून मोकळी जागा महामंडळाचे ताब्यात दयावयाची आहे.

२९)प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी राखुन ठेवले असुन याबाबत घेतलेल्या निर्णयाची कारणे देणे अथवा खुलासा करणे त्यांचेवर बंधनकारक नाही.

उपरोक्त नमुद केलेल्या १३ आगार येथील मोकळी प्रत्येकी १५० चौ. फुट मोकळया जागेवर स्वखर्चाने कॅन्टीन उभारून सेवकासाठी स्वच्छ, ताजे व माफक दरात खा| पदार्थाचा पुरवठा करणेकरिता मोकळी जागा भाडेतत्वावर देण्याच्या निविदेबाबत वरील अट क्रं. १ ते २९ अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असुन समजुन घेतलेल्या आहेत. सदर अटी–शर्ती मला बंधनकारक असुन ते मला पुर्णत: मान्य आहेत.

दिनांक:

ठिकाण:

निविदाधारकची स्वाक्षरी व नांव